महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | सोमवार, दि. ९ फेब्रुवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ९१ किंमत : ५ रु. | पाने ४


**दिन विशेष...**

१६८९ : राजाराम महाराजांचे रायगडावर मंचकारोहण झाले.

१८७४ : स्वातंत्र्यशाहीर कवी गोविंद यांचा जन्म झाला.

१८९७ : नारायण मेघाजी लोखंडे यांचे निधन.

१९३३ : साने गुरुजींनी शामची आई या कादंबरीच्या लेखनाला प्रारंभ केला.

सेन्सेक्स ८३,५८०.४० + २६६.४७ (०.३२%)

डॉलर ₹ ९०.५८

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३३ | १३ |
| दिल्ली | २४ | १० |
| मुंबई | ३२ | २० |
| नागपूर | ३१ | १४ |
| पुणे | ३२ | १० |

**सुविचार**

आपल्या आयुष्यातील प्रत्येक व्यक्ती महत्वाची आहे; त्यांच्या उपस्थितीचे सन्मान करा.

सूर्योदय - सूर्यास्त
स.-७:०१ संध्या-६:२३

**सोने – चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,५८,५१०/- २,८५,०००/-

**केळी भाव**

नवती : १३५५ ते १३६०
पिल बाग : ११०१ ते ११०२
कांदे बाग : ----

# ‘औद्योगिक क्षेत्रात गुंडगिरी करणाऱ्यांना ठोकून काढू’

## अहिल्यानगर येथील खासगी प्रकल्पाच्या उद्घाटनप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस यांचा इशारा

वृत्तसंस्था । अहिल्यानगर

**औद्योगिक क्षेत्रात झुंडशाही-गुंडशाही खपवून घेतली जाणार नाही. सुपा औद्योगिक क्षेत्राची वेगाने वाढ होताना येथे काहीजण उद्योजकांना त्रास देण्याचे ‘उद्योग’ करत आहेत, अशी माहिती आपणाला मिळाली आहे. उद्योजकांना होणारा त्रास सहन केला जाणार नाही. अशा घटकांना ठोकून काढू, असा स्पष्ट इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला. लगेच त्यांनी ठोकून काढू म्हणजे कायद्याने ठोकून काढू, अशीही पुस्ती जोडली.**



अहिल्यानगर-पुणे रस्त्यावरील सुपा (ता. पारनेर) औद्योगिक क्षेत्रातील खाजगी प्रकल्पाचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते आज, रविवारी करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. उद्योग मंत्री उदय सामंत, पालकमंत्री राधाकृष्ण विखे, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, आमदार काशिनाथ दाते, आमदार बबनराव पाचपुते, हभप नामदेवशास्त्री, हभप महंत शिवाजी महाराज यावेळी उपस्थित होते.

नागरिकांना उद्योगांकडून त्रास होत असेल तर अधिकृत यंत्रणेकडे दाद मागा. मात्र त्यांना दिलेला त्रास खपवून घेतला जाणार नाही. सुपा औद्योगिक क्षेत्रात नवे उद्योग येत असताना येथे काही वाईट ‘उद्योग’ तयार झाले आहेत. काहीजण उद्योजकांना त्रास देत असल्याची माहिती मिळाली आहे. ‘इज ऑफ डूइंग बिजनेस’, उत्पादन खर्च कमी व कायदा-सुव्यवस्था या आधारावर महाराष्ट्रात उद्योग वाढ होत आहे. मात्र अशा परिस्थितीत औद्योगिक क्षेत्रातील एखादी छोटी घटनाही कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने गांभीर्याने घेतली जाईल. जिल्हा पोलीस अधीक्षकांना मी तशा स्पष्ट सूचना दिल्या आहेत, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. महाराष्ट्रात उद्योग वाढताना पर्यावरणही जपायचे आहे. त्यामुळे उद्योग हे पर्यावरण पूरकच असायला हवेत.

उद्योगवाढ व पर्यावरण एकत्र साधायचे आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. यापूर्वी उद्योग वाढ केवळ मुंबई-पुणे क्षेत्रातच होत होती. आता उद्योग वाढीचेही विकेंद्रीकरण सुरू करण्यात आले आहे. महाराष्ट्राच्या प्रत्येक भागात उद्योग सुरू करण्याचे प्रयत्न आहेत. आत्मनिर्भर भारतासाठी ‘मेक इन इंडिया’ महत्त्वाचे आहे. त्या माध्यमातून आयातीला पर्याय निर्माण करण्याचे प्रयत्न आहेत. भारताची अर्थव्यवस्था वाढताना उत्पादन क्षेत्राचा त्याला मोठा हातभार लागणार आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

**तौरल इंडिया कंपनीचे संस्थापक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी भरत गीते यांनी गेल्या वर्षी दावोस गुंतवणूक परिषदेमध्ये महाराष्ट्रात गुंतवणूक यावी म्हणून मोठे सहकार्य केले. यंदाही दावोस परिषदेमध्ये त्यांनी महाराष्ट्राच्या सहकार्याची भूमिका घेतली. त्यामुळे ते महाराष्ट्राचे ‘औद्योगिक राजदूत’ म्हणून भूमिका बजावत आहेत, असेही कौतुक मुख्यमंत्र्यांनी केले.**

**➢ उद्योग मंत्री उदय सामंत म्हणाले, दावोसला गेल्यानंतर आम्ही काय करतो व आल्यानंतर काय होते हे सुपा औद्योगिक क्षेत्रातील ‘तौरल इंडिया’ या एक वर्षातच उत्पादन सुरू झालेल्या प्रकल्पाने विरोधकांना उत्तर दिले आहे, तेही एका मराठी उद्योजकानेच दिले आहे. ‘तौरल इंडिया’ या प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी भरत गीते यांनी प्रकल्पाची माहिती देताना ५०० कोटी रुपयांची गुंतवणूक करून १२०० जणांना रोजगार उपलब्ध झाल्याचे सांगितले.**

### ➢ औद्योगिक वीजदर ५ वर्षे स्थिर

**महाराष्ट्रात उद्योजकांसाठी पोषक वातावरण आहे. पुढील पाच वर्षात औद्योगिक वीजदर वाढणार नाही. याची काळजी राज्य सरकार घेणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सभेत बोलताना जाहीर केले.**

### ➢ उत्तर महाराष्ट्रात ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक

**दावोस गुंतवणूक परिषदेतून महाराष्ट्रात जी गुंतवणूक होणार आहे, त्यामध्ये उत्तर महाराष्ट्रातील ५ जिल्ह्यांमध्ये ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे, त्यातून ७५ हजार जणांना रोजगार मिळणार आहे. यापैकी नगर जिल्ह्यात १२ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे व १८ हजार जणांना रोजगार उपलब्ध होणार असल्याचा दावा मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला. दावोस परिषदेमध्ये प्रत्यक्षात जे करार होतात त्यापैकी ७५ टक्के करार मार्गी लागतात, केवळ २५ टक्के करार बदललेल्या भू-राजकीय परिस्थितीमुळे मार्गी लागू शकत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.**

## थोडक्यात

### मराठी हिंदी वादावर संघाचे मातृभाषेला प्राधान्य

**मुंबई ।** पालकांनी विद्यार्थ्यांना मातृभाषेतूनच शिक्षण द्यावे तसेच विदेशी भाषांचा वापर टाळावा, असे रोखठोक प्रतिपादन रा. स्व. संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी केले. भारतीय भाषांचा वापर कमी होत असल्याबद्दल चिंता व्यक्त करीत पालकांनी मुलांशी घरी मातृभाशेतूच संभाषण करावे, असे आवाहन केले. संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त आयोजित व्याख्यानमालेत पहिले पुष्प गुंफताना भागवत यांनी मातृभाषेतून शिक्षणाचा पुरस्कार केला.

### भाजप शहराध्यक्षाचा राजीनाम्याचा स्टंट अंगलट

**नाशिक।** महापालिकेच्या महापौर, उपमहापौरपदासाठी आपल्या पसंतीच्या नगरसेवकांना संधी न दिल्यामुळे भाजपचे शहराध्यक्ष सुनील केदार यांचा राजीनाम्याचा स्टंट त्यांच्याच अंगलट आला. केदार यांनी कुंभमेळामंत्र्यांनाच आव्हान दिले. त्यामुळे प्रदेश पातळीवरूनच केदार यांची कानउघडणी झाल्यानंतर २४ तासांत ‘यू टर्न’ घेत आपले समाधान झाल्याचा हास्यास्पद दावा त्यांनी केला.

### नाशिकमध्ये मनसेची शिंदे गटासोबत युती?

**नाशिक ।** येथे उद्या महापौर आणि उपमहापौरपदासाठी निवडणूक पार पडणार आहे. येथे भाजपचे ७२ नगरसेवक निवडून आले आहेत. त्यामुळे भाजपकडे महापौर-उपमहापौर पदासाठी एक हाती सत्ता आहे. यातच कोणताही दगाफटका होऊ नये यासाठी भाजपकडून काळजी घेतली जात आहे. दुसरीकडे भाजपचा मित्रपक्ष असलेल्या उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या शिवसेनेने आज मनसे सोबत युती करत नवीन गट स्थापन केला आहे. दरम्यान, येथे शिंदे गट-भाजप एकमेकांच्या विरोधात निवडूक लढले आहेत.

## प्रगट दिनी लाखावर भाविकांनी फुलली शेगाव नगरी!



वृत्तसंस्था । बुलढाणा

**‘धन्य आज दिन संत दर्शनाचा, अनंत जन्मीचा क्षीण गेला, मज वाटे त्यासी अलिंगन द्यावे,सदा न सोडावे चरण तयाचे,’ या अमृतवाणी प्रमाणे संत गजानन महाराजांचा १४८ वा प्रगट दिन उत्सव सोहळा आज भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला.**

या सोहळ्यानिमित्त संतनगरी लाखावर भाविकांनी फुलल्याचे दिसून आले. राज्यभरातून आलेल्या कमी अधिक हजार दिंड्या व वारकऱ्यांच्या जय घोषानी शेगाव नगरीतील वातावरण आणखीनच मंगलमय झाल्याचे दिसून आले. श्रींच्या प्रगट दिनानिमित्त ७ फेब्रुवारीच्या संध्याकाळपर्यंत राज्याच्या कानाकोपऱ्यातून साडेसातशेच्या वर भजनी दिंड्या संतनगरीत दाखल झाल्या होत्या. भजनी दिंड्या येण्याचा ओघ रात्री उशिरापर्यंत सुरु होता. प्रगट दिन उत्सव सोहळ्यास

(पान २ वर)

### पक्षशिस्त मोडाल तर याद राखा; मंत्री गिरीश महाजन यांचा इशारा

वृत्तसंस्था । नाशिक

पक्षाला वेठीस धरणाऱ्यांचे रुसवे, फुगवे आता चालणार नाहीत. यापुढील काळात पक्षशिस्त मोडाल तर याद राखा, चूक खपवून घेणार नाही, अशा कडक शब्दांत कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी भाजप नेते, पदाधिकाऱ्यांना थेट इशारा दिला. निवडणुका आटोपल्या असून, आता नाशिककरांनी टाकलेला विश्वास सार्थ ठरवा, अशा सूचना देत त्यांनी नवनिर्वाचित पदाधिकारी व नगरसेवकांचे कान टोचले. महापालिका निवडणूक काळात उमेदवार निश्चिती आणि त्यानंतर महापौर उमेदवार निवड करताना गोंधळ घालणाऱ्यांना पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना कानपिचक्या देत महाजन यांनी मनातील सल बोलून दाखविली.

## दिल्लीमध्ये देशव्यापी आंदोलन

### • जातीनिहाय जनगणनेवरून ओबीसींचा मोदी सरकारला इशारा

वृत्तसंस्था । नागपूर

अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीसोबतच ओबीसींची जातनिहाय जनगणना करण्याचे केंद्र सरकारने जाहीर केले होते. यासंदर्भात २२ जानेवारीला राजपत्र जारी करीत जनगणनेसंबंधी ३३ सूची जाहीर करण्यात आल्या. बाराव्या क्रमांकावर अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीचा उल्लेख आहे. मात्र ओबीसींचा उल्लेख नाही. यामुळे ओबीसी समाजामध्ये प्रचंड संतापाची लाट पसरली आहे. राष्ट्रीय ओबीसी महासंघ आणि अन्य संघटनांनी २३ मार्चला दिल्ली येथे ओबीसींच्या जातीनिहाय जनगणनेसह यूजीसीचा नवीन कायदा आदी विषयांवर देशव्यापी आंदोलन पुकारले आहे.



ओबीसी संघटना आणि विरोधकांच्या प्रचंड दबावानंतर केंद्र सरकारने मे २०२५ मध्ये जातीनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतला. केंद्रीय रेल्वे तथा माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी ही माहिती दिली होती. ऑक्टोबर २०२६पासून जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये आणि त्यानंतर उर्वरित भागात मार्च २०२७पासून जनगणना सुरू करण्यात येणार असल्याचे १६ जून २०२५ ला स्पष्ट करण्यात आले होते. त्यानंतर जनगणना आयुक्तांनी यासंदर्भात एक अधिसूचना काढली होती. ७ जानेवारीला राजपत्र जारी केले गेले.

२२ जानेवारीला जनगणना करण्यासाठी ३३ सूची तयार करून राजपत्रात समाविष्ट करण्यात आल्या. यामध्ये घर क्रमांक, जनगणना घर क्रमांक, सामग्री, घराची स्थिती, कुटुंब क्रमांक, कुटुंबातील व्यक्तींची संख्या, कुटुंबप्रमुखाचे नाव, (पान २ वर)

**राजपत्रातील बाराव्या सूचीत अनुसूचित जाती आणि जमातीचा उल्लेख करताना इतरांसाठी अन्य शब्द वापरण्यात आला आहे. ओबीसी समाजाचा स्पष्ट उल्लेख कुठेही नाही. केंद्र सरकारला जागे करण्यासाठी दिल्ली येथे २३ मार्चला देशव्यापी आंदोलन केले जाणार आहे.**

**- सचिन राजूरकर,**
महासचिव, राष्ट्रीय ओबीसी महासंघ.


## देशभरातील फिजिओथेरपी क्षेत्राला मोठा दिलासा

# फिजिओथेरपिस्टना ‘डॉ.’ पदवी व स्वतंत्र प्रॅक्टिसचा अधिकार

## केरळ उच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निकाल

वृत्तसंस्था । कोची

**देशातील फिजिओथेरपिस्टांच्या हक्कांना बळ देणारा ऐतिहासिक निकाल केरळ उच्च न्यायालयाने दिला आहे. इंडियन असोसिएशन ऑफ फिजिओथेरपिस्ट्स यांच्या बाजूने निकाल देत न्यायालयाने पात्र फिजिओथेरपिस्टना ‘डॉ.’ हा उपसर्ग वापरण्याचा तसेच कोणत्याही अनावश्यक बंधनांशिवाय स्वतंत्रपणे प्रॅक्टिस करण्याचा कायदेशीर अधिकार असल्याचे स्पष्ट केले आहे.**




**➢ इंडियन असोसिएशन ऑफ फिजिओथेरपिस्ट्सने या निकालाला भारतातील फिजिओथेरपीच्या इतिहासातील मैलाचा दगड ठरवले आहे. नॅशनल कमिशन फॉर अलाइड अँड हेल्थकेअर प्रोफेशन्स, देशभरातील फिजिओथेरपिस्ट, शिक्षक, विद्यार्थी आणि समर्थकांचे आभार मानले आहेत. हा निर्णय भविष्यात आरोग्यसेवेत फिजिओथेरपिस्टांची भूमिका अधिक स्पष्ट व सक्षम करणारा ठरणार असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.**

इंडियन असोसिएशन ऑफ फिजिकल मेडिसिन अँड रिहॅबिलिटेशन यांनी दाखल केलेली रिट याचिका क्रमांक ४१०६४/२०२५ न्यायालयाने फेटाळून लावली. या निकालामुळे फिजिओथेरपी ही स्वतंत्र, वैज्ञानिक व पुराव्याधारित आरोग्यसेवा शाखा असल्याची ठोस न्यायिक मान्यता मिळाली आहे. इंडियन असोसिएशन ऑफ फिजिओथेरपिस्ट्स अध्यक्ष प्रा.डॉ.संजीव के. झा यांनी या निर्णयाचे स्वागत करताना सांगितले, हा निकाल केवळ कायदेशीर विजय नसून संपूर्ण फिजिओथेरपी समुदायाचा सन्मान आणि स्वायत्तता मान्य करणारा ऐतिहासिक टप्पा आहे. यामुळे फिजिओथेरपिस्टांच्या व्यावसायिक ओळखीला बळ मिळाले आहे.

या निर्णयामुळे देशभरातील लाखो फिजिओथेरपिस्ट आणि विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, (पान २ वर)

## शासनाच्या कर्जमाफी समितीत कर्जबाजारी शेतकऱ्यालाच स्थान नाही!

प्रतिनिधी । जळगाव

**शेतकऱ्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवण्याच्या उद्देशाने थकीत कर्ज फेडीकरिता अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना सुचविण्यासाठी महाराष्ट्र सरकारने ३० ऑक्टोबर २०२५ रोजी उच्चस्तरीय समितीची स्थापना केली होती. या समितीच्या रचनेवरून सुरूवातीपासून निर्माण झालेला वाद ६ फेब्रुवारीच्या सुधारित शासन निर्णयानंतर आणखी जास्त चिघळला आहे. कारण, सदर समितीत कर्जबाजारी शेतकरी वर्गालाच प्रतिनिधित्व देण्यात आलेले नाही.**

शेतकऱ्यांची थकीत कर्जाच्या विळख्यातून सोडवणूक करण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना करण्याबाबत शासनाला शिफारशी करण्यासाठी मुख्यमंत्र्यांचे आर्थिक सल्लागार तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, मित्र प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली ३० ऑक्टोबर २०२५ च्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीच्या अध्यक्षांनी शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या समितीमध्ये अपर मुख्य सचिव (जलसंपदा), प्रधान सचिव (माहिती व तंत्रज्ञान), सचिव (पदुम), (पान २ वर)

## संपादकीय

### सोशल मीडियाला वयाचे बंधन?

तंत्रज्ञानाच्या वेगाने बदलणाऱ्या युगात आज प्रत्येक व्यक्तीच्या हातात स्मार्टफोन स्थिरावला आहे. संवादाचे माध्यम म्हणून सुरू झालेली समाजमाध्यमे आता मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहेत. मात्र या तांत्रिक प्रगतीची एक गडद बाजू आता प्रकर्षाने समोर येत आहे ती म्हणजे डिजिटल व्यसन. विशेषतः लहान मुले आणि किशोरवयीन मुलांमध्ये या व्यसनाचे प्रमाण चिंताजनक पातळीवर पोहोचले आहे. याच पार्श्वभूमीवर भारताचे मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन यांनी यंदाच्या देशाच्या वार्षिक आर्थिक पाहणी अहवालात एक अत्यंत महत्त्वाचा आणि धाडसी सल्ला सरकारला दिला आहे. समाजमाध्यमांच्या वापरासाठी वयाची अट निश्चित करण्याची वेळ आता आली असून लहान मुलांना या आभासी जगापासून दूर ठेवण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. भारतासारख्या खंडप्राय देशात जिथे मेटा आणि यूट्यूब यांसारख्या प्लॅटफॉर्मसाठी सर्वात मोठी वापरकर्ता बाजारपेठ उपलब्ध आहे तिथे अशा प्रकारच्या निर्बंधांची चर्चा होणे ही बाब जागतिकस्तरावर देखील मोठा चर्चेचा विषय ठरणारी आहे. आर्थिक पाहणी अहवालात केवळ आकड्यांची जुळवाजुळव नसते तर देशाच्या सामाजिक आरोग्याचा आरसाही त्यात प्रतिबिंबित होत असतो. नागेश्वरन यांनी आपल्या अहवालात नमूद केले आहे की, तरुण वापरकर्ते हे सक्तीच्या वापरास आणि हानिकारक मजकुरास अधिक बळी पडण्याची शक्यता असते. त्यामुळे वयावर आधारित प्रवेशमर्यादा विचारात घेणे ही काळाची गरज बनली आहे. जागतिकस्तरावर पाहिले तर भारत अशा प्रकारचा विचार करणारा पहिला देश नाही. गेल्या वर्षी ऑस्ट्रेलियाने १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडिया बंदी लागू करून जगात एक नवा पायंडा पाडला आहे. त्याचप्रमाणे फ्रान्सच्या नॅशनल असेंब्लीने नुकताच १५ वर्षांखालील मुलांवर सोशल मीडिया बंदी घालणाऱ्या कायद्याला पाठिंबा दिला आहे. ब्रिटन, डेन्मार्क, स्पेन आणि ग्रीस यांसारखे प्रगत देशही सध्या या विषयावर सखोल अभ्यास करत आहेत. भारतानेही या जागतिक प्रवाहाशी सुसंगत पावले उचलल्यास तो एक ऐतिहासिक निर्णय ठरेल. मात्र, भारताची लोकसंख्या आणि येथील तांत्रिक साक्षरतेचे प्रमाण पाहता अशा कायद्याची अंमलबजावणी करणे हे एक मोठे आव्हान असणार आहे. आर्थिक सल्लागारांनी केवळ बंदीचा मार्ग सुचवलेला नाही तर त्यांनी कौटुंबिक स्तरावर काही बदलांची शिफारस केली आहे. मुलांचा स्क्रीन टाइम मर्यादित करणे, दिवसातील काही तास उपकरणांशिवाय व्यतीत करणे आणि कुटुंबासोबत ऑफलाइन उपक्रमांमध्ये सहभागी होणे या गोष्टींना प्रोत्साहन देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली आहे. आजची मुले मैदानी खेळांपेक्षा मोबाइलमधील आभासी खेळांमध्ये अधिक रमत आहेत. महानगरांमध्ये तर ही समस्या अधिक प्रमाणात दिसून येते. कारण, इथे खेळण्यासाठी मैदाने, उद्याने यांची वानवा आहे. तसेच गावकुसामध्ये असणाऱ्या गल्ल्यांमध्ये ज्याप्रमाणे मुले–मुली एकत्र येतात तशी रचना शहरांमध्ये दिसत नाही. परिणामी, अनेक मुले एकटेपणाने आपापल्या घरात–बंगल्यात गुदमरत जगतात.

# महामार्गाच्या कामात अडथळा ठरणाऱ्या अतिक्रमणावर चालला हातोडा

## लळिंग टोल नाक्यापासून चाळीसगाव चौफुलीपर्यंत अतिक्रमण हटाव मोहिमेला सुरुवात

प्रतिनिधी । धुळे

**मुंबई–आग्रा राष्ट्रीय महामार्गाच्या सहा पदरीकरणाच्या कामाला अडथळा ठरणाऱ्या अतिक्रमणांवर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून शनिवारी (दि.७) कारवाई करण्यात आला. लळिंग टोल नाक्यापासून सुरु झालेल्या या अतिक्रमण हटाव मोहिमेत रस्त्याच्या दुतर्फा असलेली साधारणतः ३० ते ४० अतिक्रमणे हटविण्यात आली.**



गेल्या अनेक वर्षांपासून महामार्गालगत हॉटेल्स, चहाच्या टपऱ्या, पान टपऱ्या, पंक्चर दुकानांचे अतिक्रमण झाले होते. या अतिक्रमणमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत होता व त्यामुळे अपघातांची शक्यता बढावली होती. दरम्यान, याबाबत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणने अतिक्रमणधारकांना वारंवार नोटिसा बजावल्या होत्या. तसेच कारवाईपूर्वी ४८ तासांची मुदतही दिली होती. मात्र त्यानंतरही अतिक्रमणे न हटविल्याने शनिवारी (दि.७) या अतिक्रमणवर कारवाई करण्यात आली. सकाळी ९ वाजेपासून सुरू झालेल्या या अतिक्रमण हटाव मोहिमेदरम्यान अतिक्रमणधारकांची चांगलीच धावपळ उडाली. काही व्यावसायिकांनी अतिक्रमणे काढण्यासाठी वेळ मागितला; मात्र मुदत संपूनही अतिक्रमण न काढल्याने प्रशासनाने थेट कारवाई केली. कारवाईदरम्यान कायदा–सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी तगडा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. डीवायएसपी जाधव यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी उपस्थित राहून मोहिमेवर लक्ष ठेवले.

### ➢ दोन दिवस सुरू राहणार मोहीम

**लळींग टोल नाक्यापासून चाळीसगाव चौफुलीपर्यंत महामार्गाच्या दुतर्फा असलेली सर्व अतिक्रमणे हटविण्यात येणार असून ही मोहिम पुढील दोन दिवस सुरू राहणार आहे. अतिक्रमणधारकांनी स्वतःहून अतिक्रमणे काढून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन मोहाडी पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक शिल्पा पाटील यांनी यावेळी केले.**

# वंदना गावित यांची आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड



प्रतिनिधी । धडगाव

**धडगाव येथे कार्यरत असलेल्या महिला पोलीस हवालदार वंदना गावीत यांची थायलंड येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेसाठी निवड झाली आहे.**

नाशिक येथे मास्टर गेम असोसिएशनतर्फे खुल्या बॅडमिंटन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत नंदुरबार जिल्हा पोलीस दलाच्या महिला पोलीस हवालदार वंदना गावित यांनी महिला सिंगल स्पर्धेत सुवर्णपदक व मिक्स खेळामध्ये रौप्य पदक प्राप्त केले. त्यांनी केलेल्या या कामगिरीच्या जोरावर त्यांची थायलंड येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यांना असोसिएशनचे सचिव बाळू चव्हाण यांच्याहस्ते पदक देऊन सन्मानित करण्यात आले.

त्यांच्या या यशाबद्दल पोलीस अधीक्षक श्रवणदत्त एस, अप्पर पोलीस अधीक्षक अशित कांबळे, उपविभागीय अधिकारी दत्ता पवार, धडगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र जगताप आदींनी अभिनंदन करुन थायलंड येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. गावित यांना कोच म्हणून ईश्वर गावित यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

# इंटर्नशिप प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये चौघांची निवड

प्रतिनिधी । शहादा

विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय, सिनिअर आर्ट्स महिला महाविद्यालय, इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, रिसर्च अँड डेव्हलपमेंट शहादा व किरण अकॅडमी (पुणे) यांच्या संयुक्त विद्यमाने विकास कॅम्पसमधील वरिष्ठ महाविद्यालयात इंटर्नशिप प्लेसमेंट ड्राइव्हचे आयोजन करण्यात आले होते.

यात रेशमा पाडवी, कृतिका भोई, आवेस बागवान, कामरान सिद्दीकी या चार विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. त्यांच्या यशाबद्दल सर्वत्र कौतूक होत आहे.

# परीक्षेची भीती न बाळगता आत्मविश्वासाने सामोरे जा!



## ● प्राचार्या सुरेखा पाटील यांचे विद्यार्थ्यांना आवाहन

प्रतिनिधी । शहादा

**विद्यार्थ्यांनी परीक्षा काळात पुरेशी झोप, योग्य आहार घ्यावा. फास्ट फूड, बाहेरचे उघड्यावरील अन्नपदार्थ खाणे टाळावे. परीक्षेची कोणतीही भिती, न्यूनगंड मनात बाळगू नये. परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जावे, असे आवाहन प्राचार्या सुरेखा पाटील यांनी केले.**

शहादा येथील सौ.जी.एफ. पाटील कनिष्ठ महाविद्यालय व शेठ व्ही.के. शहा विद्यालयातील इयत्ता १० वी आणि १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी त्या बोलत होत्या. याप्रसंगी उपमुख्याध्यापक एस.आर. जाधव, पी.बी. पटेल यांच्यासह सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

पुढे बोलतांना प्राचार्या सुरेखा पाटील यांनी, माध्यमिक शिक्षण मंडळाच्या सूचनेनुसार सर्व परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या गैर प्रकाराला थारा मिळणार नाही, असे सांगून पालकांनी परीक्षा काळात आपल्या पाल्यावर अतिरिक्त ओझे देऊ नये, पाल्य ताणतणाव मुक्त राहण्यासाठी घरातील वातावरण आनंदी ठेवावे, त्यांना मानसिक आधार द्यावा, विद्यार्थ्यांनी परीक्षेच्या वेळेपूर्वी केंद्रावर उपस्थित राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांना कॉपीमुक्त परीक्षेची शपथ देण्यात आली.

## पान १ वरुन

**प्रगट दिनी लाखावर......**

२ फेब्रुवारीपासून प्रारंभ झाला. फेब्रुवारी श्रींच्या मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये दररोज मंदिरामध्ये सकाळी ६ ते ६.४५ काकडा, सकाळी ७.१५ ते ९.१५ भजन, दुपारी ४ ते ५ प्रवचन, सायंकाळी ५.३० ते ६ हरिपाठ व रात्री ८ ते १० पर्यंत श्रीहरी कीर्तन पार पडले. ९महाराष्ट्रातील नामवंत महाराजांचे कीर्तन पार पडले. महारुद्र स्वाहाकार यज्ञाला २ फेब्रुवारीला आरंभ होऊन आज ८ फेब्रुवारी श्रींच्या प्रगटदिनी सकाळी १० वाजता यागाची पूर्णाहुती व अवभृत स्नान झाले. त्यानंतर रविवारी सकाळी भरत बुवा पाटील, म्हैसवाडी यांचे सकाळी १० ते १२ शेगांवी 'श्रींच्या प्रगट दिनानिमित्त' कीर्तन पार पडले. आकर्षक सजावट– श्रींच्या प्रगट दिन उत्सव निमित्त मंदिरात व मंदिर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. श्रींच्या समाधी मंदिरावर, परिसरात पिवळा रंगाची विधुत रोषणाई व तर प्रवेशद्वार यावर रंगीबेरंगी आकर्षक अशी विधुत रोषणाई करण्यात आली . मंदिर परिसर संपूर्ण केळीचे खांब लावून सजवण्यात आला होता.श्रींच्या मंदिर परिसरात गर्दी होईल हे लक्षात घेऊन एकेरी मार्ग करण्यात आला आहे. त्यामध्ये श्रींची समाधी दर्शन व्यवस्था, श्रीमुख दर्शन व्यवस्था, महाप्रसाद, पारायण कक्ष मंडप आदि व्यवस्था करण्यात आली आहे. पालखीची नगर परिक्रमा – दुपारी ४ वाजताचे आसपास श्रींच्या पालखीचे नगरपरिमेला सुरुवात झाली. गजानन महाराज मंदीर उत्तर द्वार (जनरेटर रुम जवळील) मधुन बाहेर, महात्मा फुले बँकेसमोरुन, क्रांतीसूर्य ज्योतीराव फुले चौक, संत सावता महाराज चौक, श्री हरिहर मंदीर, भीम नगर, तिन पुतळा परिसर, न प शाळा क्र. २, फुले नगर, श्री प्रगटस्थळ, सितामाता मंदीर, श्री लायब्ररी पुलावरुन श्रीं मदीराचे पश्चिम द्वार मधुन श्रींचे मंदीर परिसरामध्ये पालखी परतली.

**दिल्लीमध्ये देशव्यापी......**

त्याचे लिंग, विवाहित दाम्पत्यांची संख्या, खोल्यांची संख्या, पिण्याच्या पाण्याचे मुख्य स्रोत, पेयजलाची उपलब्धता, वीज, शौचालय, रेडिओ, दूरचित्रवाहिनी, इंटरनेट, संगणक, भ्रमनध्वनी, चारचाकी वाहन, मुख्य धान्य अशा विविध बाबींचा समावेश केला आहे. बाराव्या क्रमांकावर अनुसूचित जाती आणि जमातीचा उल्लेख करण्यात आला आहे. तर इतरांसाठी अन्य शब्दाचा प्रयोग करण्यात आला असून ओबीसींचा स्पष्ट उल्लेख नाही. त्यामुळे ओबीसींची स्वतंत्र जातीनिहाय जनगणना होणार की नाही, असा संभ्रम निर्माण झाला आहे. त्यामुळे सरकारला पुन्हा जागे करण्यासाठी राष्ट्रीय ओबीसी महासंघ, बीसी वेल्फेअर असोसिएशन तेलंगाना, आंध्रप्रदेश आणि ओबीसी महासभा मध्यप्रदेश आणि देशातील सर्व ओबीसी संघटनांतर्फे देशव्यापी आंदोलन करण्यात येणार आहे. दिल्ली येथील जंतर- मंतर मैदानावर हे आंदोलन होणार आहे. प्रमुख मागण्या काय? – सन २०२७ होणाऱ्या जातीनिहाय जनगणनेत ओबीसीचा स्पष्ट उल्लेख करावा, यूजीसीचा नवीन कायदा लागू करा, केंद्रात ओबीसींचे स्वतंत्र मंत्रालय स्थापन करा, क्रिमिलेअरची मर्यादा वाढवण्यात यावी.

**फिजिओथेरपिस्टना 'डॉ.'......**

प्राथमिक आरोग्यसेवेत फिजिओथेरपिस्टांची भूमिका अधिक प्रभावी होणार आहे. प्रतिबंधात्मक उपचार, वेदनानियंत्रण तसेच कार्यक्षम पुनर्वसनामध्ये फिजिओथेरपिस्टांचे योगदान अधिक व्यापकपणे मान्य होणार आहे. प्रा. डॉ. झा पुढे म्हणाले की, या निकालामुळे रुग्णांना थेट फिजिओथेरपी सेवा उपलब्ध होतील, नैतिक आणि स्वतंत्र प्रॅक्टिसला चालना मिळेल, तसेच शिक्षण व संशोधन क्षेत्र अधिक बळकट होईल.

**शासनाच्या कर्जमाफी समितीत......**

कृषी आयुक्त आणि व्यवस्थापकीय संचालक (महाआयटी) यांचा समावेश करण्याबाबत सूचित केले होते. त्यानुसार सदर समितीमध्ये उक्त सदस्यांचा समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. ६ फेब्रुवारी रोजी घेण्यात आलेल्या शासन निर्णयान्वये नवीन सदस्यांचा समितीत समावेशही करण्यात आला आहे. उच्चस्तरीय समितीच्या निर्णयांविषयी प्रश्नचिन्ह – मात्र , प्रत्यक्ष शेती कसून कर्जबाजारीपणाचा सामना करणारे किंवा शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी यांना समितीपासून मुद्दाम दूर ठेवण्यात आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या वास्तव समस्या, मानसिक ताण तणाव, सततची नापिकी, बाजारभावातील अनिश्चितता आणि वाढता उत्पादन खर्च यांचा योग्य विचार कर्जमाफी देताना होईल का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. नव्याने नियुक्त करण्यात आलेले सदस्य शेतकरी किंवा शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी नसून, आर्थिकदृष्ट्या सक्षम व शहरी पार्श्वभूमी असलेले आहेत. या संपूर्ण प्रकारावर राज्यातील पुरस्कारप्राप्त शेतकरी संघाचे अध्यक्ष ॲड. प्रकाश पाटील यांनीही तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली आहे. ज्यांच्यासाठी ही समिती स्थापन करण्यात आली आहे, त्यांचाच आवाज शासन ऐकून घेण्यास तयार नसेल, तर अशा समितीकडून न्याय्य निर्णयाची अपेक्षा कशी ठेवायची? असा सवाल ॲड. पाटील यांनी उपस्थित केला आहे.

# सागवानपासून वस्तू बनविण्याच्या कारखान्यावर पोलिसांची कारवाई



प्रतिनिधी । पिंपळनेर

**धामंदर जंगलात सागवानी लाकडांपासून सोपा, पलंग, दरवाजे, चौकटी बनविणाऱ्या कारखान्यावर पिंपळनेर वन विभागाने छापा टाकून कारवाई केली. या कारवाईत तीन लाखाचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.**

पिंपळनेर वनपरिक्षेत्राधिकारी ओंकार ढोले, वनपरिक्षेत्र अधिकारी विनायक खैरनार यांच्या पथकासह धुळे येथील एसआरपी विशेष बलच्या पथकाने शुक्रवारी (दि.६) दुपारी १२ वाजेच्या सुमारास ही कारवाई केली. त्यानंतर वन कर्मचाऱ्यांनी दोन पिअकप, एक ट्रॅक्टर भरून सागवानी माल हस्तगत केले. त्याची अंदाजित किंमत तीन लाख रुपये असल्याचे सांगितले जात आहे. यातील आरोपी फरार असून वन विभागातर्फे कसून चौकशी सुरू करण्यात आली आहे.

# शेतीतील नाविन्यपूर्ण कार्याबद्दल जयेश पाटील यांचा गौरव

## ● 'कृषीधन–२०२६' केळी महोत्सवात पार पडला सोहळा

प्रतिनिधी । घोडगाव

**कुसुंबा (ता. चोपडा) येथील प्रगतशील शेतकरी जयेश ज्ञानेश्वर पाटील यांना शेती क्षेत्रातील नाविन्यपूर्ण व उल्लेखनीय कार्याबद्दल कृषीधन–२०२६ कृषी प्रदर्शन व केळी महोत्सवात सन्मानित करण्यात आले. हा सन्मान पाल येथील सातपुडा विकास मंडळ संचालित कृषी विज्ञान केंद्र व कृषी विभाग, जळगाव (महाराष्ट्र शासन) यांच्या संयुक्त विद्यमाने प्रदान करण्यात आला.**



फैजपूर (ता.यावल) दि.८ फेब्रुवारी रोजी कृषीधन–२०२६ कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असून प्रदर्शनात पुरुष गटात शेती विषयक नाविन्यपूर्ण व उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल पाटील यांचा गौरव करण्यात आला. आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, केळी पिकातील उत्पादनवाढ, शास्त्रीय शेती पद्धतींचा अवलंब तसेच इतर शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरणाऱ्या कार्याची दखल घेऊन त्यांची या सन्मानासाठी निवड करण्यात आली होती. या सन्मान सोहळ्याप्रसंगी सातपुडा विकास मंडळाचे सचिव अजित पाटील, माजी आमदार व संचालक शिरीष मधुकरराव चौधरी, कृषी विज्ञान केंद्र, पाल येथील प्रभारी वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख महेश महाजन, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कुर्बान तडवी, तालुका कृषी अधिकारी दीपक साळुंखे तसेच जैन इरिगेशन प्रा. लि. येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. के. बी. पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या राज्यस्तरीय सन्मानामुळे चोपडा तालुक्यासह जळगाव अभिमानाची भावना निर्माण झाली असून जयेश पाटील यांच्यावर सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# विद्यार्थ्यांनी तणावमुक्त वातावरणात परीक्षा द्यावी!

## ● जिल्हाधिकाऱ्यांनी दहावी, बारावीच्या परीक्षार्थी विद्यार्थ्यांशी साधला संवाद

प्रतिनिधी । धुळे

विद्यार्थ्यांसाठी दहावी व बारावीचे वर्ष हे अत्यंत महत्वाचे वर्ष मानले जाते. त्यामुळे दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांनी तणाव मुक्त वातावरणात परीक्षा द्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी केले.

दहावी, बारावीच्या परीक्षांना लवकरच सुरुवात होणार असल्याने या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात परीक्षा पे चर्चा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते या बोलत होत्या.

कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजिज शेख, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) मनीष पवार यांच्यासह विविध शाळांचे विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते म्हणाल्या की, तणावमुक्त वातावरणात विद्यार्थ्यांनी अभ्यास करावा, प्रश्न सोडविण्याचा सराव करावा, सोपे प्रश्न प्रथम सोडवावेत, दहावी, बारावीच्या परीक्षानंतर विविध संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध होतात. त्याचीही माहिती विद्यार्थ्यांनी घ्यावी.

परीक्षा कालावधीत विद्यार्थ्यांनी सकस आहार घ्यावा. आवश्यकता भासल्यास पालकांशी संवाद साधावा.

**➢ पालकांनीही पाल्यांच्या क्षमतेनुसार अभ्यास करून घ्यावा. त्यांच्याशी वेळोवेळी संवाद साधावा, असे आवाहन त्यांनी केले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शेख यांनी सांगितले की, परीक्षकांसाठी जिल्ह्यात केंद्र निश्चित करण्यात आले आहेत. या परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी तणावमुक्त वातावरणात परीक्षा द्यावी. कॉपी प्रकारास प्रोत्साहन देणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.**

# न्याहळोदला तातडीने ट्रान्सफॉर्मर बसविल्याने शेतकऱ्यांना मिळाला दिलासा

प्रतिनिधी । धुळे

**रब्बीचा हंगाम शेवटच्या टप्प्यात असून त्याला पाणी देण्यासाठी शेतकऱ्यांची धावपळ सुरु असतांना ट्रान्सफार्मर जळाला. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये पाण्याअभावी पिके जळण्याची भिती निर्माण झाली. मात्र आ.राम भदाणे यांनी, या घटनेची तात्काळ दखल घेवून तातडीने नवे ट्रान्सफार्मर बसविण्याच्या सुचना वीज मंडळाला दिल्या. त्यानंतर वीज मंडळाने तातडीने कार्यवाही करत एकाच दिवशी दोन्ही ट्रान्सफार्मर बसविल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला.**

न्याहळोद येथील कापडणे रस्ता आणि पाटरस्ता शिवारातील दोन ट्रान्सफार्मर एकाच दिवशी जळाल्याची घटना घडली.

दरम्यान, सध्या गहू, हरभरा आणि मका पिकांसाठी शेवटचे पाणी देण्याची लगबग सुरु आहे. मात्र, ऐन तोंडावरच वीजपुरवठा खंडीत झाल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, आ.भदाणे यांनी या घटनेची दखल घेवून तातडीने ट्रान्सफार्मर बसविण्याच्या सुचना दिल्याने व तातडीने ट्रान्सफार्मर बसविण्यात आल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक – सागर काशिनाथ ओतारी (मोबा.– ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी –३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव –४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव– ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✽ कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी (✽ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# जिल्ह्यातील ६६ आरोग्य केंद्रांमध्ये मिळणार महात्मा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत सुविधा

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये महात्मा फुले जन आरोग्य योजना लागू करण्याचा निर्णय शासनाकडून घेण्यात आला आहे. त्याअनुषंगाने ६६ प्राथमिक आरोग्य केंद्रांची नोंदणी झाली असून या सर्व आरोग्य केंद्रांमध्ये लवकरच या योजनेंतर्गत सुविधा मिळणार आहेत.**



जिल्ह्यातील ७८ प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये ही योजना लागू होणार आहे. या नोंदणीचे काम आरोग्य विभागाने युध्दपातळीवर केल्याने ग्रामीणस्तरावरील आरोग्य सेवेचे बळकटीकरण होणार आहे. त्यामुळे रुग्णांना सेवा सुविधा मिळून मोठा दिलासा मिळणार आहे.

ग्रामीण भागातील जनतेला प्राथमिक आरोग्य केंद्रात या योजनेच्या माध्यमातून सेवा मिळणार आहे. जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये या योजनेच्या अमंलबजावणीसाठी २०२२ मध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांची नोंदणी झाली आहे. आता प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये या योजनेच्या माध्यमातून साथरोग, अपघात, सर्पदंश, विषबाधा, श्वान दंश, कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया, सामान्य प्रसुती आदी सेवा उपलब्ध आहेत.

शासनाकडून मिळणाऱ्या योजनेच्या माध्यमातून मिळणारी रक्कम कर्मचारी व अधिकारी यांना इन्सेन्टीव्ह स्वरुपात तर काही रक्कम आरोग्य केंद्रास मिळणार आहे. आरोग्य केंद्रे ही या योजनेला जोडली जात आहेत.

### ➤ रुग्णांसाठी दिलासादायक

जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांना ही योजना लागू होणार आहे. ग्रामिण भागात ही योजना या सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांना लागू होणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील रुग्णांना दिलासा मिळणार आहे.

**- डॉ. सचिन भायेकर,**
जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. जळगाव

# विद्यार्थ्यांच्या कल्पनांमधूनच उद्याचे संशोधन, तंत्रज्ञान, उद्योग आकार घेईल!

● प्रा.डॉ. प्रिती अग्रवाल यांचे प्रतिपादन




प्रतिनिधी । जळगाव

**आज सुरू असलेली इनोव्हेशनची क्रांती ही तुमच्यापासूनच सुरू होत आहे. तुमच्या तरुण, सर्जनशील आणि प्रयोगशील विचारांकडून समाजाला आणि देशाला मोठ्या अपेक्षा आहेत. विद्यार्थ्यांच्या कल्पनांमधूनच उद्याचे संशोधन, तंत्रज्ञान आणि उद्योग आकार घेणार आहेत, असे प्रतिपादन रायसोनी महाविद्यालयाच्या संचालिका प्रा.डॉ. प्रिती अग्रवाल यांनी केले.**

जी.एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट महाविद्यालयात अखिल भारतीय विद्यार्थी परिषद व सृजन ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने डीपेक्स-२०२६ आयडिया प्रेझेंटेशन राऊंड (जळगाव रिजन) या इनोव्हेशनला चालना देणाऱ्या उपक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी त्या बोलत होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून केशवस्मृती सेवासंस्था समूहाचे भरत अमळकर उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर स्पेक्ट्रम ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक नरेंद्र वाघ, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे भुसावळ प्रमुख व देवगिरी प्रदेश उपाध्यक्ष गिरीश कुलकर्णी, तंत्र शिक्षण विद्यार्थी कार्य सह-संयोजक आर्यन भालशंकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## थोडक्यात

### भाविपतर्फे १ मार्च रोजी महादिव्यांग शिबीर

**जळगाव ।** भारत विकास परिषद जळगाव शाखा व पुणे येथील दिव्यांग केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि.१ मार्च रोजी महादिव्यांग शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या शिबिरात ५०० दिव्यांग व्यक्तिंना कृत्रिम मॉड्युलर पायाचे मोफत वितरण करण्यात येणार आहे. शिबिरासाठी पूर्व नोंदणी करणे गरजेचे असून त्यासाठी चौधरी (८३०८४७८६२४), नायर (७५८८४७८६२४) किंवा संपर्क फाउंडेशन ४२, गांधीनगर, जिल्हा पेठ, कांताई सभागृहाजवळ जळगाव येथे संपर्क साधावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### वैष्णवी पार्क भागातील रस्ते करण्याची मागणी

**जळगाव ।** शहरातील निमखेडी शिवारातील वैष्णवी पार्क या भागात गेल्या १२ ते १३ वर्षांपासून रस्त्यांची कामे झालेली नाहीत. त्यामुळे या भागातील रस्त्यांची मोठी दुरावस्था झाली असून नागरिकांना विशेषत: ज्येष्ठ नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागल आहे. ठिकठिकाणी पडलेल्या मोठं-मोठ्या खड्यांमुळे पायी चालणाऱ्यांसह वाहनधारकांना देखील कसरत करावी लागत आहे. या भागातील जुनी कॉलनी असूनही या भागाकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप या भागातील रहिवाशांनी केला असून या भागातील रस्त्यांची कामे लवकरात लवकर करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

### राष्ट्रवादीच्या ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी कल्पिता पाटील



**जळगाव ।** राष्ट्रवादी महिला कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) महाराष्ट्र प्रदेशाच्यावतीने कल्पिता पाटील यांची जळगाव ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या अध्यक्षा अ‍ॅड.रोहिणी खडसे यांच्या स्वाक्षरीचे नियुक्तीपत्र जारी करण्यात आले असून, दि.५ फेब्रुवारी रोजी ही नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे. कल्पिता पाटील या राष्ट्रवादी काँग्रेसच्या एकनिष्ठ, सक्रिय आणि अभ्यासू कार्यकर्त्या म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात युवती कॉंग्रेसच्या माध्यमातून केली असून, विविध पदांवर जबाबदारीने काम करत पक्षसंघटनेत स्वत:चे वेगळे स्थान निर्माण केले आहे.

# प्रोफेसर कॉलनीतून ८ लाखांची कार लांबवली

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील प्रोफेसर कॉलनी परिसरातील आय.एम.आर. कॉलेजजवळून ८ लाख रुपये किमतीची कार चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी जिल्हापेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

प्रोफेसर कॉलनी जवळील रामबाग कॉलनी येथील रहिवासी प्रदीप जगतसिंग पाटील (वय-६१) यांनी त्यांची कार (क्र. एम.एच.१९, डी.व्ही.७७९०) मंगळवारी (दि.३) रात्री १२ वाजेच्या सुमारास राहत्या घरासमोर पार्क केली होती. दुसऱ्या दिवशी म्हणजेच बुधवारी (दि.४) सकाळी ८ वाजेच्या सुमारास त्यांना आपली कार जागेवर दिसून आली नाही. त्यानंतर त्यांनी कारचा सर्वत्र शोध घेतला.

मात्र ती मिळून न आल्याने त्यांनी शनिवारी (दि.७) जिल्हापेठ पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास मिलिंद सोनवणे करीत आहेत.

# गोलाणी मार्केटमध्ये साचला कचरा

प्रतिनिधी । जळगाव

शहरातील प्रमुख व्यापारी संकुलांपैकी एक असलेल्या गोलाणी व्यापारी संकुलात गेल्या काही दिवसांपासून ठिकठिकाणी कचऱ्याचे ढिग साचू लागले आहेत.

त्यामुळे दुर्गंधी पसरत असून या ठिकाणी खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांसह व्यापाऱ्यांना देखील त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे हा कचरा लवकरात लवकर उचलण्यात यावा व मार्केटची नियमित स्वच्छता करण्यात यावी, अशी मागणी होवू लागली आहे.

# नूतन मराठा महाविद्यालयात गुणवंतांचा गौरव

प्रतिनिधी । जळगाव

येथील नूतन मराठा महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात पार पडला. या सोहळ्यात शैक्षणिक, क्रीडा आणि संरक्षण क्षेत्रात यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्याहस्ते गौरव करण्यात आला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.एल.पी. देशमुख हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य प्रा.डॉ. माधुरी पाटील, प्रा.डॉ.के.बी. पाटील, प्रा.आर.बी.देशमुख, प्रा.संजय पाटील, प्रा.डॉ.एन.जे. पाटील, डॉ.एस.एम. वानखेडे, प्रा.नितीन बाविस्कर उपस्थित होते.

कार्यक्रमात राष्ट्रीय छात्रसेनेच्या दोन विद्यार्थिनींची सीमा सुरक्षा दलात नियुक्ती झाल्याबद्दल कौतुक करण्यात आले तर राष्ट्रीय व राज्यस्तरावर प्राविण्य मिळवणाऱ्या खेळाडूंना प्रमाणपत्र, ट्रॅक सूट आणि स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आणि नुकतेच स्पर्धा परीक्षेतून एसटीआयपदी निवड झालेले सुमेध गाढे यांच्याहस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

यावेळी बोलतांना प्राचार्य डॉ. देशमुख यांनी, महाविद्यालयातून स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण होऊन उच्च पदावर नियुक्त झालेल्या माजी विद्यार्थ्यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्याची परंपरा नूतन मराठा महाविद्यालयाने जपली आहे. नवीन विद्यार्थ्यांना यातून प्रेरणा मिळावी, हा यामागचा मुख्य उद्देश असल्याचे सांगितले.

**सुवर्णपदक विजेत्यांचा सन्मान**

यावर्षी महाविद्यालयाच्या सात विद्यार्थिनींनी विद्यापीठस्तरावर सुवर्णपदक पटकावून संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

क्रीडा क्षेत्रात खेलो इंडिया अंतर्गत सुवर्णपदक मिळवणारी मुष्टीयोद्धा दिशा पाटील हिचा विशेष सत्कार करण्यात आला. दिशा सध्या स्पेन येथे आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी गेलेली असून, तिथेही ती यश संपादन करेल, असा विश्वास प्राचार्यांनी व्यक्त केला. तसेच नागपूर येथे सॉफ्टबॉल स्पर्धेत सुवर्णपदक मिळवणारी कुमारी बागुल आणि कुस्तीत विशेष कामगिरी करणारी हर्षल जाधव हिचा स्मृतीचिन्ह व गदा देऊन गौरव करण्यात आला.

# भारतीय तत्त्वज्ञानातूनच आधुनिक नैतिक समस्यांचे समाधान : डॉ.पांडे

## मू.जे.महाविद्यालयात पार पडले राष्ट्रीय चर्चासत्र

प्रतिनिधी । जळगाव




आजच्या धावपळीच्या आणि तंत्रज्ञानाच्या युगात मानवासमोर अनेक नैतिक आव्हाने उभी आहेत. या आव्हानांचा सामना करण्यासाठी भारतीय तत्त्वज्ञानातील मूल्ये आणि विचार आजही तितकेच समर्पक आहेत, असे प्रतिपादन अलाहाबाद विद्यापीठाचे तत्त्वज्ञान विभाग प्रमुख प्रो.डॉ. ऋषीकांत पांडे यांनी केले.

खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटी संचलित मूळजी जेठा महाविद्यालयातील तत्त्वज्ञान विभागातर्फे 'भारतीय तत्त्वज्ञान आणि समकालीन नैतिक आव्हाने' या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन शनिवारी (दि.७) करण्यात आले होते. यावेळी बीजभाषण करताना ते बोलत होते. पुढे बोलतांना डॉ.ऋषीकांत पांडे यांनी, भारतीय दर्शनांमधील नीतिशास्त्राची मांडणी केली. याप्रसंगी अन्य प्रमुख वक्त्यांनीही विविध विषयांवर प्रकाश टाकला. प्रो.डॉ. आनंद मिश्रा यांनी प्राचीन भारतीय मूल्यांची आधुनिक काळातील उपयुक्तता स्पष्ट केली. डॉ.जयंत उपाध्याय यांनी समकालीन जागतिक समस्या आणि त्यावर भारतीय तत्त्वज्ञानाद्वारे मिळणारे उपाय यावर भाष्य केले. हे चर्चासत्र ऑफलाईन आणि ऑनलाईन अशा दोन्ही माध्यमांतून पार पडले. त्यामुळे देशभरातील अनेक प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थी या चर्चासत्रात सहभागी होऊ शकले. प्रास्ताविक तत्त्वज्ञान विभाग प्रमुख डॉ.रजनी सिन्हा यांनी केले.

# बेंडाळे महाविद्यालयात पार पडली नोवाटेक २०२६ स्पर्धा

प्रतिनिधी । जळगाव

**येथील डॉ.अण्णासाहेब जी.डी. बेंडाळे महिला महाविद्यालयातर्फे आयोजित नोवाटेक २०२६ स्पर्धेतर्गत पोस्टर प्रेझेंटेशन आणि आयटी क्विझ स्पर्धा घेण्यात आल्या.**




कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ.आर. के. नारखेडे यांच्याहस्ते करण्यात आले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ.पी.एन. तायडे, डॉ. सुहास पाटील उपस्थित होते. उद्घाटन सत्रात प्राचार्य नारखेडे यांनी, विद्यार्थ्यांच्या विकासासाठी स्पर्धा कशा महत्त्वाच्या आहेत ते सांगितले. डॉ. सुहास पाटील यांनी पोस्टर प्रेझेंटेशनचे परीक्षण करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेत गायत्री चौधरीने प्रथम, विनंती सोनवणेने द्वितीय, आयटी क्विझ स्पर्धेत शेख अरशियाने प्रथम तर रितिका भिरूडने द्वितीय क्रमांक पटकावला. स्पर्धेच्या आयोजनासाठी संगणक शास्त्र विभागातील प्रा.डॉ. मोनाली खाचणे, प्रा.अश्विनी देपुरा, प्रा.वैशाली विसपुते, प्रा.सायली पाटील यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. प्रास्ताविक संगणक शास्त्र विभाग प्रमुख डॉ.हर्षाली पाटील यांनी केले.

# शहरात माता रमाई आंबेडकर जयंती उत्साहात साजरी





प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील विविध सामाजिक, राजकीय संस्थांतर्फे माता रमाई आंबेडकर यांची १२८ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. त्यानिमित्त प्रतिमापूजन, त्रिशरण-पंचशील ग्रहण यासह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.**

**अर्पण सेवा ट्रस्ट व पवन चरिटेबल ट्रस्ट**

भारतासाठी महान कार्य करणाऱ्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनात अनेक व्यक्तींचे मोलाचे योगदान आहे. त्यात त्यांची पत्नी रमाबाई आंबेडकर यांचे अतुलनीय असे कर्तृत्व आहे. त्यांचा बाबासाहेबांची विवाह झाला तेव्हा बाबासाहेब लहान होते. त्यांनी बाबासाहेबांना अत्यंत खंबीरपणे साथ दिली. स्त्रिया सुद्धा हिम्मतवान आहेत, हे दाखवून दिले. त्यांचा जीवनप्रवास सुद्धा संघर्षमय व प्रेरणादायी असाच राहिला आहे, असे मत डॉ. विलास नारखेडे यांनी व्यक्त केले.

अर्पण सेवा ट्रस्ट व पवन चरिटेबल ट्रस्टतर्फे माता रमाबाई आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली. त्यानिमित्त आयोजित कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी अ‍ॅड.सलीम शेख, लीलाधर नारखेडे, राजेश वाणी, पवन नारखेडे, अण्णा महाजन, बाबू वाघ, संजय बनसोडे, शंकर चव्हाण, राहुल मोरे, मुकूंद माळी, भीमा कोळी, विनोद सोनवणे, कवी संजय पाटील, लोकेश राणे, जगदीश कुमार, कैलास भोळे आदी उपस्थित होते.

यावेळी बोलतांना प्रा.उत्तम सुरवाडे यांनी, डॉ.बाबासाहेब हे संशोधन, प्रबोधन, शिक्षण, सामाजिक, राजकीय कार्याच्यानिमित्ताने विदेशात गेले. त्यावेळी त्यांचा संसार त्यांनी चालविला व महत्त्वाची साथ दिली. निष्ठेने कार्य केले. त्यांनी जीवनात अनेक चढउतार पाहिले. प्रतिकूल परिस्थिती पाहिली पण रमाई रडत बसले नाही. त्या हिम्मतीने संकटाविरुद्ध लढल्या, असे उद्गार काढले.

**भिमानं बहुउद्देशीय संस्था**

माता रमाई आंबेडकर यांच्या १२८ व्या जयंतीनिमित्त जाणता राजा नगरातील प्रबुद्ध बुद्ध विहार येथे त्रिशरण पंचशील ग्रहण करुन माता रमाई यांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शीतल अहिरे आणि अनिता सोनवणे याच्याहस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. त्यानंतर विविध मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी भिमानं बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा योगिता अडकमोल, उपाध्यक्ष किरण निकम, कोषाध्यक्ष पुनम सोनवणे, कल्पना आरक, ज्योती सपकाळे, वत्सला सपकाळे, रुपाली नन्नवरे, माया सोनवणे, अरुण पांडव, श्रावण तायडे, अजय तायडे, ज्ञानेश्वर तांबे, योगेश अडकमोल, बॉबी निकम, सतीश सोनवणे, आनंद आरक, भागवत सपकाळे, विजय तायडे, अजय सोनवणे, रितेश तायडे यांच्यासह भिमानं बहुउद्देशीय संस्थेचे पदाधिकारी, परिसरातील उपासक, उपासिका उपस्थित होते.

**जी.एम. फाउंडेशन**

जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांच्या जी.एम. फाउंडेशन या संपर्क कार्यालयातमाता रमाबाई आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, खा.स्मिता वाघ, आ.राजूमामा भोळे, जिल्हाध्यक्ष दीपक सूर्यवंशी, डॉ.राधेश्याम चौधरी, चंद्रकांत बाविस्कर, महापौर दीपमाला काळे, उपमहापौर मनोज चौधरी, जिल्हा पदाधिकारी उदय भालेराव, पितांबर भावसार, प्रसिध्दी प्रमुख मनोज भांडारकर, राहूल पाटील, प्रकाश पंडित, गणेश माळी, योगेश पाटील, मयूर भदाणे, मुविकोराज कोल्हे, स्वप्निल साखळीकर, चेतन शर्मा यांसह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# गडखांब शिवारात शेतात लागवड केलेला गांजा पकडला

## एक बिघा क्षेत्रात सहा फुटांची वाढलेली झाडे पोलिसांनी केली जप्त

प्रतिनिधी । अमळनेर

**तालुक्यातील गडखांब शिवारात पोलिसांनी धाड टाकून गांजाचे एक बिघा क्षेत्रात लागवड केलेला ओला व सुका गांजा पकडला आहे. सुरेश लोटन पाटील असे शेतकऱ्यांचे नाव आहे. लाखो रुपयांचा गांजा जप्त केला आहे.**



पोलिस निरीक्षक दत्तात्रय निक्म यांना गोपनीय माहिती मिळाली की, गडखांब शिवारात गट नं. २३२४ मध्ये एका शेतकऱ्याने गांजाची लागवड केली आहे. त्यांनी डीवायएसपी विनायक कोते यांची परवानगी घेऊन तहसीलदार रुपेशकुमार सुराणा याना पंचनाम्यासाठी घेऊन अमळनेर पोलिसांनी पहाटेच कारवाई केली. उपनिरीक्षक भगवान शिरसाठ, पोलीस उपनिरीक्षक शरद काकळीज, पोलीस उपनिरीक्षक नामदेव बोरकर, हेडकॉन्स्टेबल मिलिंद सोनार, विनोद संदानशिव, प्रशांत पाटील, निलेश मोरे, नितीन मनोरे, सुनील तेली, विनोद सोनवणे, राहुल पाटील, उदय बोरसे, सिद्धांत शिसोदे, गणेश पाटील, संजय सोनवणे, गणेश पाटील, श्यामल पारधी, निलेश पाटील, विनोद पाटील यांनी ७ रोजी सकाळी ६ वाजता छापा टाकला. गडखांब येथील सुरेश लोटन पाटील या शेतकऱ्याने मका सोबत शेतात गांजा लावलेला आढळून आला. सुमारे सहा फूट उंचीची झाडे उगवलेली होती. शेतकऱ्याने शेतात पाच ते सात गोण्या ओला गांजा बांधून ठेवलेला दिसून आला. तसेच एका ठिकाणी गांजा वाळवायला ठेवलेला दिसला. काही दिवसांपूर्वी शेतकऱ्यांने गांजा विकल्याचे देखील कबुल केले. फॉरेन्सिक पथकाने देखील पंचनामा सुरू केला. कायदेशीर प्रक्रिया झाल्यानंतर सर्व झाडे उपटवून मुद्देमाल जप्त करण्यात येणार आहे.

# रेल्वे प्रकल्पांमुळे बाधित शेतकऱ्यांच्या समस्या त्वरित सोडवणार : ना.रक्षा खडसे




प्रतिनिधी । रावेर

**रावेर लोकसभा मतदारसंघ अंतर्गत रेल्वे विभागामार्फत विविध विकास प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. या प्रकल्पांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत जमीन संपादनाची प्रक्रिया सुरू आहे. यामध्ये जामनेर–पाचोरा–बोदवडपर्यंतची वाढीव रेल्वे लाईन तसेच भुसावळ–खंडवा तिसरी व चौथी रेल्वे लाईन यांचा समावेश आहे. या कामांमुळे अनेक शेतकरी बाधित झाले आहेत. त्यांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यांच्या समस्या तत्काळ सोडवण्याची ग्वाही केद्रिय मंत्री रक्षा खडसे यांनी दिली.**

या पार्श्वभूमीवर आज केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, जिल्हाधिकारी रोहन घुगे तसेच रेल्वे विभागाचे अधिकारी यांच्या उपस्थितीत संबंधित प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांची बैठक घेतली. बैठकीदरम्यान शेतकऱ्यांच्या समस्या सविस्तरपणे जाणून घेऊन त्या तातडीने सोडविण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या.

यावेळी विशेषतः बोदवड व भुसावळ तालुक्यांतील तसेच वरणगाव परिसरातील रेल्वे रुळालगत असलेल्या शेतकऱ्यांसाठी आरओबी व आरयूबी उभारणी, शेतात जाण्यासाठी रस्त्यांची सुविधा तसेच पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी योग्य उपाययोजना करण्याबाबत स्पष्ट निर्देश दिले.



# थोडक्यात

### फैजपूर येथे उद्या प्रधानमंत्री घरकुल योजना शिबीर

**फैजपूर ।** गरजू नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ मिळावा या उद्देशाने दि. ९ फेब्रुवारी रोजी देवीवाडा येथील साईबाबा मंदिराजवळील नगरपरिषदेच्या बहुउद्देशीय सभागृहात विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरासाठी अर्जदारांनी सिटी सर्व्हे उतारा, उत्पन्न दाखला, आधार कार्ड, बँक पासबुक झेरॉक्स तसेच आवश्यक कागदपत्रांसह सकाळी १० वाजता उपस्थित राहावे, असे आवाहन नगरसेवक विनोद (पप्पू) चौधरी यांनी केले आहे. सदर शिबिर नगराध्यक्षा दामिनी सराफ, उपनगराध्यक्षा निकिता कोळी, प्रभागाच्या नगरसेविका दीपाली भारंबे, मुख्याधिकारी अविनाश गांगुर्डे तसेच सर्व नगरसेवक–नगरसेविका यांच्या उपस्थितीत पार पडणार आहे. तरी नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन नगरसेवक पप्पू चौधरी व साई ग्रुप मित्र मंडळाने केला आहे.

### संविधान आर्मीतर्फे आज रेल रोको आंदोलन

**जळगाव ।** ऑल इंडिया संविधान आर्मीतर्फे विविध मागण्यांसाठी ९ फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजता जळगाव येथे संविधान निर्माते परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या रेल्वे स्टेशन जवळील पुतळ्यासमोर अभिवादन करून आक्रोश तिरंगा रेल रोको आंदोलन करण्यात येणार आहे.

भुसावळ तालुक्यातील साक्री येथील दोघा विद्यार्थिनींची झालेली हत्या प्रकरणातील सर्व मागण्या मान्य करा. प्रजासत्ताकदिनी भाषणादरम्यान भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा नामोल्लेख टाळणाऱ्या मंत्री गिरीश महाजन यांचा याप्रकरणी राजीनामा घेवून व ॲट्रॉसिटी ॲक्ट अंतर्गत कार्यवाही व्हावी, अशी मागणी केली आहे.

# बोरोले नगरात महाशिवरात्रीनिमित्त अखंड कीर्तन सप्ताह

प्रतिनिधी । चोपडा

**श्री विश्वनाथ महादेव मंदिर बोरोले नगर नं. १ याठिकाणी दरवर्षाप्रमाणे भागवत व कीर्तन सप्ताह महादेव मंदिर समितीतर्फे आयोजित करण्यात आला आहे. दि. ९ ते १६ फेब्रुवारी या कालावधीत हा सप्ताह होणार आहे.**

सर्व बोरोले नगर परिसरातील भाविक भक्तांच्या सहकार्याने हा कार्यक्रम होत असतो.

भागवत कथेचा सर्व खर्च कै. सुभाष काळू पाटील यांचे स्मरणार्थ महेश सुभाष पाटील यांच्यातर्फे दिला जाणार आहे. भागवत कथा ही कथावाचक ह.भ.प. अशोक महाराज (शिरपूरकर) यांच्या सुमधूर वाणीने संपन्न होत आहे. कथा ही दुपारी १ ते ४ वाजेदरम्यान होणार आहे. कीर्तनासाठी दररोज वेगवेगळे ह.भ.प. महाराज येणार आहेत. कीर्तनाची वेळ रात्री ८.३० वाजता आहे. पालखी सोहळा व शोभायात्रा दि.१५ रोजी दुपारी २ ते ५ वाजेदरम्यान निघणार आहे. कै. मनोजकुमार अग्रवाल यांच्या स्मरणार्थ संजय अग्रवाल यांच्याकडून महाप्रसाद दि. १६ रोजी सकाळी ११ ते २ वाजेपर्यंत मंदिराच्या प्रागंणात होणार आहे.

तरी या कार्यक्रमाचा भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन श्री विश्वनाथ महादेव मंदिर समितीतर्फे करण्यात आले आहे.

# पंकज माध्यमिक विद्यालयात बालआनंद मेळावा उत्साहात

प्रतिनिधी । चोपडा

येथील पंकज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात नवीन शैक्षणिक धोरण २०२० च्या उद्दिष्टपूर्ती अंतर्गत आनंददायी शनिवारी दप्तर मुक्त शाळा या उपक्रमात विद्यार्थ्यांचे जीवन कौशल्य वृद्धिंगत करणारा व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी बाल आनंद मेळावा २०२६ चे आयोजन करण्यात आले. आनंददायी व उत्साहवर्धक अशा कार्यक्रमाचे उद्घाटन. दीपाली बोरोले यांच्या हस्ते व असंख्य महिला यांच्या उपस्थितीत करण्यात आले.



या मेळाव्यात विद्यार्थ्यांसाठी विविध मनोरंजनात्मक खेळात सहभाग घेतला. तसेच विविध मनोरंजक स्पर्धा घेण्यात आल्या. या आनंददायी उपक्रमात पालकांनीही सक्रिय सहभाग नोंदवून आपल्या चिमुकल्यांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी लावलेल्या विविध पदार्थांच्या स्टॉलला मान्यवरांनी भेट

**• विद्यार्थ्यांनी स्वतः बनवलेले विविध खाद्य पदार्थांचे स्टॉल लावले होते. एकूण ७९ स्टॉल लावण्यात आले होते. या उपक्रमांमध्ये इयत्ता ५ वी ते ९ वी च्या विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला आणि दप्तर मुक्त शाळेत व्यवहार ज्ञान समजून घेतले.**

देऊन आस्वाद घेत विद्यार्थ्यांच्या पाक कृतीबद्दल गौरवोद्गार काढले आणि या दप्तरमुक्त उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंद, आत्मविश्वास, व्यवहाराचे ज्ञान आणि सहकार्याची भावना निर्माण झाल्याचे बोलून दाखविले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पौर्णिमा भादले, दीपक सोनवणे, अविनाश पाटील, बाजीराव तायडे, जयेश मंडपे, विनोद जाधव, प्रमोद पाटील, मोनिका देसाई, विजय पाटील वेलसिंग बारेला, गजानन पाटील, आणि सर्व शिक्षक व कर्मचारीवृंद परिश्रम घेतले. तर स्टॉल साठी सर्व विद्यार्थी आणि पालकांचे मोठे सहकार्य लाभले.

### संतोषीमाता हॉल खेळाडूंसाठी उपलब्ध करावा; मातृभूमी मंडळाची मागणी

**भुसावळ ।** शहरातील संतोषी माता बहुउद्देशीय हॉल बेकायदेशीर असल्याने नगरपालिकेने ताब्यात घेतल्यापासून होणाऱ्या सरावाच्या ठिकाणी सर्व खेळाडूंना तसेच पथकाला अडचण होत आहे. विशेष अडचण महिला खेळाडूंना येत आहे. कराटे, कब्बडी तसेच ढोल पथकातील लोकांना तेथे कपडे बदलण्यासाठी, पाणी मारण्यासाठी समस्या निर्माण होत आहे. याबाबत उपविभागीय अधिकारी जितेंद्र पाटील, पालिका मुख्याधिकारी विवेक धांडे, नगराध्यक्षा गायत्री भंगाळे तसेच तिघे गटनेत्यांना जय मातृ क्रीडा मंडळातर्फे निवेदन देण्यात आले आहे.

# तारकेश्वर प्राथमिक विद्यामंदिरात स्नेहसंमेलन

प्रतिनिधी । यावल

येथील तारकेश्वर प्राथमिक विद्यामंदिरात मोठ्या उत्साहात व आनंदात शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम संपन्न झाला.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजेश लक्ष्मण बारेला यांची निवड करण्यात आली. प्रमुख पाहुणे रमेश देशमुख, भूषण कोळी हे होते. प्रास्ताविक धनंजय काकडे यांनी केले.

सूत्रसंचलन अतुल शिरसाठ यांनी केले. पल्लवी रावते व नयना देशमुख यांनी अथक परिश्रम घेतले. शाळेतील बालकलाकारांनी अतिशय सुंदर व उत्साहपूर्ण सादरीकरण केले. यास उपस्थित शिक्षकांसह पालकांनी मोठी दाद दिली.

### अजितदादा पवार यांच्या अस्थींचे वरखेडे धरणात विसर्जन

प्रतिनिधी । चाळीसगाव

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे नुकतेच निधन झाले आहे. त्याचा अस्थिकलशाचे शनिवारी चाळीसगाव येथे आगमन झाले. शनिवारी सायंकाळी तालुक्यातील सर्व राजकीय पक्ष, सामाजिक संघटना, सर्वपक्षीय नेते, कार्यकर्ते तसेच दादांवर प्रेम करणाऱ्या नागरिकांनी अस्थिकलशाचे दर्शन घेतले. तर आज दि.८ रोजी अस्थींचे विसर्जन वरखेड धरणात करण्यात आले. यावेळी सर्व राजकीय पक्ष, सामाजिक संघटना, सर्वपक्षीय नेते, कार्यकर्ते तसेच दादांवर प्रेम करणारे नागरिक अस्थी विसर्जनासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चौगाव येथील श्रीक्षेत्र भोलेनाथ मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह

प्रतिनिधी । चोपडा

**चोपडा पासून जवळच असलेल्या चौगाव येथिल श्री क्षेत्र भोलेनाथ देवस्थान येथे सालाबादप्रमाणे यंदाही महाशिवरात्री निमित्त अखंड हरिनाम संकीर्तन सप्ताहाचे आयोजन दि. ९ फेब्रुवारी पासून करण्यात येणार असून यात रोज सकाळी काकड आरती, सायंकाळी हरीपाठ व रात्री ८/३० ते१०/३० कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे.**



यात दि. ९ रोजी ह.भ.प.रविंद्र महाराज हरणे मुक्ताईनगर, दि. १० रोजी ह.भ.प.योगी दत्तानाथ महाराज शिंदखेडा, दि. ११ रोजी ह.भ.प. भानुदास महाराज अमळनेर कर, दि. १२ रोजी ह.भ.प.रविंद्र महाराज वरसाडेकर, दि.१३ रोजी ह.भ.प.कोमल महाराज खेडीभोकरीकर, दि. १४ रोजी ह.भ.प.भावेश महाराज विटनेरकर, दि. १५ रोजी ह.भ.प.योगेश महाराज वाघाडीकर यांचे कीर्तन होणार असून दि. १६ रोजी ह.भ .प.गजानन महाराज चौगावकर यांच्या काल्याचा कीर्तनाने कीर्तनी सप्ताहाचा समारोप होणार आहे.

दि. १५ रोजी नगरप्रदक्षिणा व दिंडी सोहळा होणार असून दि. १६ रोजी महाप्रसाद दूपारी १२ ते ५ वाजेपर्यंत होणार असून भाविकांनी या कीर्तन श्रवणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री भोलेनाथ सत्संग मंडळ चौगाव, श्री श्रीराम भजनी मंडळ चौगाव व ग्रामस्थ मंडळ चौगाव यांनी केले आहे.

# लहान मुलांच्या आहारात मैद्याचे पदार्थ देणे टाळावे

## • सतत जागरण करणे शक्यतो टाळाच; निरोगी आयुष्याची गुरुकिल्ली

प्रतिनिधी । जळगाव

**आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत अबाल–वृद्धांच्या आरोग्याच्या समस्या वाढत चालल्या आहेत. लहान मुलांच्या आहारात मैद्याचे पदार्थ देणे टाळावे. कारण बदललेली जीवनपद्धती, चुकीच्या आहाराच्या सवयी आणि जागरण याचा थेट परिणाम आरोग्यावर होत आहे. अशा परिस्थितीत काही सोप्या व घरगुती उपायांद्वारे निरोगी आयुष्य जगता येऊ शकते.**

**तुळशीची पाने आणि गुळ**

दररोज सकाळी तुळशीची २ पाने खाणे आरोग्याला फायदेशीर ठरते. यामुळे सर्दी, ताप, मलेरियाचा त्रास होत नाही. जर तुम्हाला सतत कफचा त्रास होत असेल तर नेहमी छातीवर मुलहठी चोळावी. यामुळे कफ बाहेर पडण्यास मदत होते. यासह रोज जेवणानंतर बडीशेफ आणि जुना गुळाचे सेवन करावे. असे केल्याने प्रचनक्रिया सुरळीत राहते.

**पोटाची वाढलेली चरबी अशी करा कमी**

अनेकांना पोटाची चरबी वाढल्याची समस्या निर्माण होते. पोटाची वाढलेली चरबी कमी करण्यासाठी दररोज एक वाटी दहीचे सेवन करावे.



**प्रथिनांसाठी करा या गोष्टींचे सेवन**

मुगात मटनापेक्षा जास्त प्रमाणात प्रथिने असतात. त्यामुळे आहारात मुगाची उसळ, आमटी, हिरव्या मुगाची भाजी असे पदार्थांचा समावेश करावा. तसेच गव्हाचा कोंब किंवा गव्हाचा चिकाचे सेवन केल्याने रोग प्रतिकारशक्ती वाढते.

**मांसाहाराचे अतिसेवन टाळा**

अनेक जण जिभेचे चोसले पूर्ण करण्यासाठी सतत मांसाहार करतात. मांसाहाराचे अतिसेवन आरोग्यासाठी घातक ठरु शकते. जवळपास १६० प्रकारचे आजार हे केवळ मांसाहार केल्याने होतात. त्यामुळे मांसाहाराचे अतिसेवन टाळावे.

**लहान मुलांच्या आहारात टाळा हे पदार्थ**

लहान मुलांच्या आहाराबाबत विशेष काळजी घेतली पाहिजे. त्यानुसार, १४ वर्षाखालील लहान मुलांना मैद्याचे पदार्थ, बिस्किट, समोसा आणि मैद्याचे इतर पदार्थ खाण्यास देवू नये.

**त्वचेच्या समस्येवर करा हा उपाय**

जर अनावधानाने चटका लागला असेल तर भाजलेल्या ठिकाणी बटाट्याचा रस, हळद, मध, घृतकुमारी यापैकी काही एक लावल्याने थंड वाटते आणि व्रण देखील पडत नाही. तसेच डोळ्याची जळजळ, खाज, लाली दूर करण्यासाठी पायाच्या अंगठ्याला मोहरीच्या तेलाने मालिश केल्याने आराम मिळतो.

**असे राखा दातांचे आरोग्य**

पांढरे शुभ्र आणि निरोगी दातांसाठी निंबू, मोहरीचे तेल, हळद आणि मीठ एकत्र करुन दात घसावे. असे केल्याने दातांशी संबंधित अनेक आजार दुर होतात. मात्र, तुम्हाला डोळ्यांचा त्रास असेल तर हा उपाय करणे टाळावे.

**सततचे जागरण टाळावे**

हल्ली अनेक जण उशीरापर्यंत जागी राहतात. मोबाईलचा अतिवापर याचं एक मोठ कारण म्हणता येईल. मात्र, उशीरा झोपणे किंवा सतत जागरण करणे आरोग्यासाठी खूप घातक ठरतं. जागरणाने शरिराची रोग प्रतिकारशक्ती कमजोर होते. तसेच डोळ्यांच्या आजाराचा धोका देखील यामुळे वाढतो.

वरील दिलेल्या टिप्स ह्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या आणि लाभदायक आहे. या टिप्स फोलो करुन तुम्ही निरोगी आयुष्य जगू शकतात, तुम्हाला म्हातारपणापर्यंत निरोगी राहायचेय का? मग या सोप्या टिप्सचे पालन करा.

### सूर्या भंगाळेने वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना वाटले शालेय साहित्य



प्रतिनिधी । न्हावी, ता.यावल

**येथील खाजगी प्राथमिक शाळेत इयत्ता दुसरीतील विद्यार्थी सूर्या गितेश्वर भंगाळे याने आपल्या वाढदिवसा निमित्त वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना पेन वाटप केले. तसेच शिक्षकांनाही पेन वाटप केले.**

वाढदिवसानिमित्त सूर्या भंगाळे याने राबवलेल्या या सुंदर उपक्रमाचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे. त्याने वाढदिवसाचा सदउपयोग गरीब विद्यार्थ्यांना भेट वस्तू देऊन साजरा केला. हे सर्व घडू शकले ते फक्त सूर्या भंगाळे याच्या आई–वडिलांच्या आदर्श संस्कारामुळे. यावेळेस शाळेचे मुख्याध्यापक डी. एच. तळेले, वंदना चौधरी, संदीप घुले, वैभव फिरके, हिरकणी पाटील, प्रवीण चव्हाण, गोकुळ इंगळे, बशीर तडवी यांसह विद्यार्थी उपस्थित होते.